# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**जुलै २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत पडझड झालेल्या विहिरीचे पुर्नसर्वेक्षण करणेबाबत**

**(१) ९४२४ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जुलै, २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत पडझड झालेल्या विहिरींचे पुर्नसर्वेक्षण करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील अतिवृष्टीमुळे खचलेल्या, बुजलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करतांना झालेल्या अनियमीततेमुळे वंचित असलेल्या शेतक-यांच्या विहिरीचे सुध्दा पुर्नसर्वेक्षण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विहिरींचे पुर्नसर्वेक्षण करून वंचित शेतक-यांना लाभ मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्हयात सन २०१३ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात खचलेल्या ७६४ व बुजलेल्या १०५ अशा एकूण ८६९ विहिरी आढळून आल्या आहेत.

(२) अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजवलेल्या विहिरींचे सर्वेक्षणामध्ये अनियमितता झालेली नाही. तसेच जुलै, २०१३ मध्ये पुनसर्वेक्षण अर्ज प्राप्त झालेले नसल्यामुळे पुनसर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजवलेल्या विहिरींच्या दुरूस्तीची कामे घेण्याबाबत शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१, दिनांक २० जुलै, २०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

---

## जळगाव जिल्हापरिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रावर काम करणाऱ्या आरोग्य सेवक व सेविकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२) २१७२९ (१७-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हापरिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रावर काम करणाऱ्या आरोग्य सेवक व सेविकांची ८६ पदे गत १ वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे लवकरात लवकर भरुन दिनांक १० जानेवारी, २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार २४४ अतिरिक्त मंजूर पदे भरण्यात यावीत अशी मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केला वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०२-२०१९) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) वित्त विभागाच्या दि. १६ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेले निर्बधं उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतीबंधानुसार १००टक्के पदभरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विहिर खोदाई कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) २३३७५ (१४-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विहिर खोदाई कामामध्ये झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, संबंधित दोषींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०१-२०१९) :** (१) व (२) सांगली जिल्हयातील पलसू तालुक्यामध्ये नरेगा अंतर्गत विहीर खोदाई कामामध्ये गैरव्यवहार झालेला नाही.

तथापि, जिल्हा परिषदेच्या दिनांक २२ मे, २०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये सन्मानीय सदस्यांनी पलूस तालाक्यातील सन २०११ ते २०१५ पर्यंतच्या विहीरींची चौकशी करण्याबाबत सूचना मांडली होती. त्यानुसार चौकशी करण्यात येत आहे.
(३) नाही.
(४) व (५) गुन्हा दाखल नसल्याने कारवाई करण्यात आली नाही.

---

## सांगली जिल्हयात सिंचन विहीर खोदाई योजनेत जिल्हा परिषद अधिकाऱ्यांकडून झालेला गैरव्यवहार

**(४) २३५५२ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, भूसूधार योजनेंचे लाभार्थी अल्पभूधारक व अनुसूचित जाती-जमातीतील पात्र लाभार्थ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत असलेल्या सिंचन विहिर खोदाई योजनेत सांगली जिल्हयात जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांच्या माध्यमातून गैरव्यवहार होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन विहीर असल्यास खोदाई न करता जुन्या विहीरीची काही प्रमाणात दुरुस्तीकरुन, कठडा बांधून ती विहिर नवीन असल्याचे दाखविले, काही विहीरीची कामे तर कागदावरच पूर्ण झाल्याचे दाखविले, विहीर पडचा दाखला कोरा करुन व विहिर कागदोपत्री अदृष्य करुन नवीन विहीरीचा प्रस्ताव सादर करणे, विहिर मंजूरी पासून विहीरीचे बांधकामाचे देयक पूर्ण होईपर्यंत २० ते ३० हजार रुपये कमिशन घेणे असे विविध प्रकार होत असल्याची बाब जिल्हयातील नागरिकांकडून निदर्शनास आली असून याबाबतीत संबंधित अधिकाऱ्याकडे लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतीत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेश दिल्यानंतरही काही अपवाद वगळता तपासणी कागदावर आणि नियम डावलण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागासवर्गीय लाभार्थ्यांची फसवणूक करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०१-२०१९)** : (१) सांगली जिल्हयात जिल्हा परिषदेतील अधिका-यांच्या माध्यमातून गैरव्यवहार झालेला नाही.

तथापि, जिल्हा परिषदेच्या दिनांक २२ मे, २०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये सन्मानीय सदस्यांनी पलूस तालाक्यातील सन २०११ ते २०१५ पर्यंतच्या विहींरींची चौकशी करण्याबाबत सूचना मांडली होती. त्यानुसार चौकशी करण्यात येत आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत सन्मानीय सदस्यांनी पलूस तालाक्यातील सन २०११ ते २०१५ पर्यंतच्या विहींरींची चौकशी करण्याबाबत सूचना मांडली होती. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशीच्या सूचना दिल्या होत्या. या सूचनेनुसार चौकशी करण्यात येत आहे.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) रुग्णालयातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवेतील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामधील ३६ पदांबाबत**

**(५) २९२८० (२१-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) रुग्णालयातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवेतील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामधील ३६ रिक्त पदे असल्यामुळे तालुक्यातील आरोग्यसेवा कोलमडली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९)** :(१) नाही.

रिक्त पदांच्या ठिकाणी जवळील वैद्यकिय अधिकारी /कर्मचारी यांना अतिरिक्त पदभार देऊन आरोग्य सेवा चालू ठेवण्यात आली आलेली आहे.

(२) व (३) वित्त विभागाच्या दि. १६ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेले निर्बधं उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतीबंधानुसार १००टक्के पदभरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**उरण (जि.रायगड) नागांव ग्रामपंचायत हद्दीतील जनतेचे प्रश्न सोडविण्याबाबत**

**(६) ४०४३९ (०५-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि. रायगड) नागांव ग्रामपंचायत हद्दीतील जनतेचे प्रश्न सोडविण्याकरिता नागांव ग्रामपंचायत व ओ.एन.जी.सी. आस्थापना यांची स्थानिक लोकप्रतिनिधीसमवेत ओएनजीसी द्रोणागिरी भवन येथे, दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत कोणकोणत्या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली व काय निर्णय घेण्यात आले,

(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :**(१) हे अंशतः खरे आहे.

सदरची बैठक ही दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी झाली नसून ती दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी झाली आहे.

(२) (३) व (४) सदर बैठकीत झालेली चर्चा व त्यावरील ओ.एन.जी.सी. चे स्पष्टीकरण याबाबतची माहिती तसेच ग्रामपंचायतीने केली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

**मुद्दा क्रमांक १ -** ग्रामपंचायत हद्दीतील सुमारे १३०० एकर जमिन ओएनजीसी प्रकल्पाकरीता संपादित झाली असून त्या संपादित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याकरीता हवा तेवढा निर्णय घेण्यात आला नाही.

**स्पष्टीकरण -** सद्य:स्थितीत नोकरभरती नसल्याने निर्णय होऊ शकत नाही. तसेच रेग्युलर नोकरभरती संदर्भात अधिकार डेहरादून येथील मुख्य कार्यालयाकडे असल्याने या कार्यालयाकडून निर्णय घेता येणार नाही.

**मुद्दा क्रमांक २ -** नागाव ग्रामपंचायतीचा विस्तार पाच पाडयांमध्ये असल्याने तेथील सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये रोड लाईट कायम राहण्याकरीता ओ.एन.जी.सी प्रकल्पाचे स्ट्रिट लाईट कनेक्शनवर नागाव गावातील रोड लाईट कनेक्शन द्यावे.

**स्पष्टीकरण -** नागांव ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामे करण्याकरीता ग्रामंपचायतीकडून प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे त्याचा योग्य तो विचार करण्यात येईल असे ओ.एन.जी.सी. प्रशासनाने आश्वासन दिले.

त्याप्रमाणे नागाव ग्रामपंचायतीकडून १) डस्टबीन खरेदी करणे २) ७ घरकुले बांधणे ३) रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेसाठी पत्र्याची शेड बांधणे ४) घंडागाडी खरेदी करणे असे एकूण चार प्रस्ताव पाडविण्यात आले. त्यापैकी डस्टबीन खरेदी, ७ घरकुले बांधणे हे प्रस्ताव मंजूर झाले असून रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेसाठी पत्र्याची शेड बांधणेचा कामास मुजंरी अंतिम टप्प्यात आहे.

त्याचप्रमाणे ओ.एन.जी.सी. प्रशासनाने कळविले आहे की, नागांव मधील रोड लाईट करीता ओ.एन.जी.सी. प्रकल्पाबाहेरील मुख्य रस्त्यावरील स्ट्रीट लाईटला कनेक्शन देता येणार नाही.

**मुद्दा क्रमांक ३ -** नागांव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत काही विभाग हा प्रकल्पाच्या बाजुला असल्याने व भौगोलिक दृष्ट्या जमिनीचा उतार दक्षिणेकडून उत्तरेकडे असल्याने प्रकल्पातील ऑईल मिश्रीत पाणी भुगर्भातील पाण्याच्या झऱ्यांना मिळाल्या कारणाने गावातील अनेक विहिरी प बोअरवेलला तेलाचा वास येत आहे.

**स्पष्टीकरण -** नागांव हद्दीतील विहिरींना किंवा बोअरवेलला तेलाचा वास येण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कारण ओ.एन.जी.सी प्रकल्पातील तेलाचा निचरा हा जमिनीमध्ये होत नसून सिल बंद टाक्यांमध्ये साठवण स्वरुपात आहे. तरीही सदर विहिरीचा सर्व्हे करुन पाण्याचे नमुने तपासले जातील व आवश्यक वाटल्यास विहिरी साफ करुन दिल्या जातील असे ओ.एन.जी.सी. प्रशासनाने मान्य केले होते. त्यानुसार ओ.एन.जी.सी. प्रशासनाने दि. ५.४.२.१७ रोजी नागाव येथील बोअरवेलच्या पाण्याचे नमुने तपासले व सदर पाण्यास स्विकार्हययोग्य गंध व चव असल्याबाबत अहवाल दिला.

**मुद्दा क्रमांक ४ -** ओ. एन.जी.सी प्रकल्पाअंतर्गत असलेल्या बांधकामाचा फेरआकारणी नमुना मोजमाप होऊन टॅक्सची आकारणी होवून ग्रामपंचायतीस वाढीव प्रापर्टी टॅक्स अदा करावा

**स्पष्टीकरण -** टॅक्स आकारणीबाबत कायदेशीर वाद न्यायप्रविष्ठ असून न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**वांगदरी (ता.रेणापूर,जि.लातूर) येथील नागरिकांना त्यांचे जागेचे कबाले वितरीत करणेबाबत**

**(७) ४७४७० (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगदरी (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील गावठाणातील जमिनीत अनेक वर्षापासून राहात असलेल्या व ग्रामपंचायतीने जागा वाटप केलेल्या नागरिकांना त्यांच्या जागेचे मालकी प्रमाणपत्र नसल्यामुळे शासनाच्या घरकुल व इतर योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याने सदर लाभार्थ्यांना त्यांचे जागेचे कबाले देण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी व संबधित नागरिकांनी तहसीलदार, रेणापूर जि.लातूर यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ व १४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांना कबाले वाटपास शासनास किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, सदर कबाले वाटपाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१) होय. हे अंशतः खरे आहे.

दिनांक १२.१०.२०१५ रोजी मा.श्री. त्र्यंबक भिसे, विधान सभा सदस्य यांनी निवेदन दिले आहे. तसेच तहसीलदार, रेणापूर यांच्याकडे दिनांक १९.०८.२०१५ रोजी काही नागरिकांनी अर्ज दिले आहेत.

(२) व (३) ग्रामपंचायत वागंदरी, ता.रेणापूर यांनी मासिक ठराव क्रमांक ४ दिनांक १९.१२.२०१४ नुसार मौ. वागंदरी, ता.रेणापूर येथील नागरिकांना गायरान (गावठाण) जागेचे कबाले मिळणेबाबत ठराव घेऊन तहसिलदार कार्यालय, रेणापूर यांना कळविले आहे. यासंदर्भात तहसिलदार, रेणापूर यांनी दि. ३०.०१.२०१८ च्या पत्रान्वये असा अहवाल दिला आहे की, मौ. वागंदरी येथील जुने गावठाण लगत दक्षिण बाजुला जमीन गट नं. ४०२ क्षेत्र १० हे. ८१ आर जमीन गायरान होते. सदर गायरान जमिनीमध्ये गावठाण विस्तारासाठी संपादीत क्षेत्र २ हे.०६ आर. आहे. गावठाण विस्तारानंतर शिल्लक जमिनीवर अतिक्रमण करुन घरे बांधलेली आहेत. दि. १२ जुलै २०११ च्या शा.नि.नुसार गायरान जमीन वाटप करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषद व ८ पंचायत समित्या व जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीत अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(८) ५४७०६ (२६-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद व ८ पंचायत समित्या व जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत मिळून ६ हजार ८३७ एवठी गट ‘क’ आणि गट ‘ड’ या संवर्गातील पदे मंजूर असून त्यापैकी ३८० पदे रिक्त आहेत तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक पद २०११ पासून रिक्त आहे व अन्य १०१ अधिका-यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४८१ पदे रिक्त असल्याने कामकाज करण्यास अडचण येत असून याबाबतचा सविस्तर अहवाल शासनाला पाठवूनही सदरहू रिक्त पदे भरण्यास विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदरहू रिक्त पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असल्याने सर्व रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे पद दि. २०/०७/२०१८ पासून भरण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) वित्त विभागाच्या दि. १६/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार पदभरतीवरील निर्बंध उठविले असल्याने जिल्हा परिषदेकडील गट “क” व “ड” संवर्गातील जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे जागा भरण्याबाबत

**(९) ६७३०० (२७-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि. पुणे) तालुक्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या १०६ जागा रिक्त असल्याने अनेक ठिकाणी एका शिक्षकावर २ ते ३ वर्ग शिकविण्याची जबाबदारी आली असल्याचे दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर तालुका शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे मागणी करुनही या शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील अनेक भाग शाळांमध्ये कमी पट असलेल्या शाळांवर जाणे शिक्षक टाळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिरुर तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) जून, २०१६ मध्ये मंजूर पदांच्या तुलनेत ९२ शिक्षकांची पदे कमी होती. परंतु सद्य:स्थितीत मंजूर पदांत ५६ शिक्षकांची वाढ झाली असून ६० पदांची कार्यरत शिक्षकांत वाढ झाली आहे. सद्य:स्थितीतही ९२ शिक्षकांची कमतरता असली तरी आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना या ठिकाणी पदस्थापना देण्यात आली आहे.

(२) पुणे जिल्हयामध्ये आंतरजिल्हा बदलीने रुजू झालेल्या शिक्षकांमधून शिरुर तालुक्यामध्ये शिक्षक उपलब्ध करुन देणेत आले आहेत.

(३) नाही. हे खरे नाही.

(४) पुणे जिल्हयातील उपशिक्षकाची बिंदू नामावली तपासून घेणेत आली असून उपशिक्षकांची रिक्त पदे भरणेची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) ७८४८८ (१५-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात मंजूर २१ पदांपैकी केवळ १० कर्मचारी हजर असून पाच जागा रिक्त, दोघे निलंबित, आणि चौघेजण रजेवर असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) व (२) कोल्हापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागात २१ पदे मंजूर असून १८ पदे कार्यरत आहेत व ३ पदे रिक्त आहेत.

(३) बदलीने २ वरिष्ठ सहाय्यक पदे जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेतील १९ योजनांना साहित्य खरेदीकरिता मान्यता देण्याबाबत**

**(११) ७८५७३ (१८-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेतील १९ योजनांना साहित्य खरेदीसाठी शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर १९ योजनांसाठी साहित्य खरेदीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीस नियोजन समितीव्दारे आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेचा निधी प्राप्त झालेला असुन त्यामधून रोखस्वरूपात थेट लाभार्थ्यांचे बँक खात्यात अनुदान जमा करणेच्या योजना वगळता उर्वरीत योजनांमधून खरेदी करावयाचे साहित्य, प्रशिक्षणे याबाबत ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र. ०९/शिकाना दि. ०६.१२.२०१६ चे परिच्छेद ४ मधे नमुद केलेप्रमाणे पूर्वमान्यता घेण्याचा प्रस्ताव

सादर केला होता. त्या प्रस्तावास ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दि. ३०.१२.२०१६ पत्रान्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

(२) सदर १९ योजनांपैकी ५ योजना हया प्रशिक्षणाच्या होत्या त्यामधून ग्रामीण व आदिवासी भागातील मुलींसाठी प्रशिक्षण घेण्यात आलेली आहेत. तसेच कुपोषित मुलांमुलींसाठी तसेच गरोदर व स्तनदा माता यांचेसाठी खरेदी करावयाचे अतिरिक्त आहाराची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर ई-निविदेस पूरेसा प्रतिसाद न मिळाल्याने तिसरे प्रसारणानंतर ई-निविदा अंतिम करण्यात आली. सदर ई-निविदा जि.प. सर्वसाधारण सभेने स्विकृती देणे बंधनकारक असल्याने व जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक झालेनंतर दि. २८.३.२०१७ रोजी जि.प. अध्यक्ष निवड झाली. प्रथम सर्वसाधारण सभा दि. ११.५.२०१७ रोजी होणार होती त्यामुळे या ई-निविदेत सन २०१५-१६ मधील निधीची तरतुद असल्याने तो सन २०१७-१८ मध्ये खर्च करता येत नाही त्यामुळे सदर ई- निविदेतील नमुद रक्कम ही कमी होणार असल्याने सदर ई-निविदा रद्द करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिह्यातील हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१२) ७९१३४ (१९-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिह्यातील ग्रामविकास विभागाअंतर्गत सन १९७८ पासून कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत घेऊन त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १६ फेब्रुवारी,२०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) असे निवेदन आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात**
**शिक्षकांची ७०६ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) ८२७०० (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षकांची ७०६ पदे रिक्त असल्याने जिल्हा परिषदेच्या शिक्षकांवर गंभीर परिणाम होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शिक्षकांची पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षकांची ६०५ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) प्राथमिक शिक्षकांच्या सेवानिवृत्ती, सेवेत असताना मृत्यू, मुदतपूर्व सेवानिवृत्ती यामुळे तसेच दि.३०/८/२०१६ च्या पटनिश्चिती- नुसार, वाढीव पदे मंजूर झाली असल्याने तसेच आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त केल्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शिक्षकांची ६०५ पदे रिक्त आहेत. उपशिक्षकांची १०० बिंदू नामावली नोंदवही मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आली असून; सदर बिंदू नामावली नोंदवही पूर्ण झाल्यानंतर प्रवर्गनिहाय पदानुसार अन्य जिल्हा परिषदेतून शिक्षक सामावून घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

---

**देऊळगाव धुबे (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील दिवंगत सहाय्यक शिक्षकाचे सर्व लाभ त्यांच्या पत्नीस मिळण्याबाबत**

**(१४) ८४५६६ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव धुबे (ता.चिखली,जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत सहाय्यक शिक्षक कार्यरत असलेल्या सोनाजी गजेबा पाटील यांच्या निधनानंतर त्यांचा भविष्य निर्वाह निधी, सेवा निवृत्ती वेतन व सेवा पुस्तकबाबतचे सर्व लाभ त्यांच्या पत्नी यांना मिळणे अपेक्षित असताना हे प्रकरण जिल्हा परिषदेत तीन वर्षापासून प्रलंबित असून त्यांच्या पत्नीचा देखील मृत्यू झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकाच्या मयत पत्नीला लाभापासून वंचित ठेवणा-या संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :**(१),(२) व (३) अंशत : खरे आहे.मृत सोनाजी गजेबा पाटील हे जिल्हा परिषद शाळा दे.धनगर येथे सहायक शिक्षक पदावर दि.२७/९/१९५५ पासून कार्यरत होते. बुनियादी प्रशिक्षण, वाशिम येथे हजर होण्याकरीता त्यांना दि.१.१.१९७६ रोजी

कार्यमुक्त केल्यापासून अनधिकृतपणे गैरहजर होते. ते जर जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असते तर नियत वयमानानुसार दि.३१/१२/१९९४ रोजी सेवानिवृत्त झाले असते. शिवाय दि.१/१/७६ ते दि.३१/१२/९४ हा त्यांचा गैरहजेरीचा कालावधी शासनाने अनधिकृत गैरहजेरी ठरविली आहे. परंतु दरम्यानच्या काळात त्यांनी जिल्हा परिषदेकडे संपर्क साधलेला नाही अथवा सेवानिवृत्तीवेतनाची मागणी देखील केली नाही. त्यांचा मृत्यू दि.१६/१/१९९९ रोजी झाला असून, त्यांच्या मृत्यूनंतर १४ ते १५ वर्षापर्यंत त्यांच्या पत्नीनेदेखील कोणत्याही आर्थिक लाभाबाबत मागणी केली नाही. त्यांच्या पत्नीकडून दि.४/३/२०१४ रोजी विनंती अर्ज सादर केला आहे. जिल्हा परिषद बुलढाणा यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन दि.५/६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सेवानिवृत्ती प्रकरण सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच मृत पाटील यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात अल्प रक्कम असल्याने महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ च्या नियम २७ मधील १, २, ३ व ४ नुसार भविष्य निर्वाह निधी रक्कम देय होत नाही.

---

## मेळघाटातील जिल्हा परिषदेच्या शाळेत कोरकु भाषा शिकवणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(१५) ८६४५९ (१२-०८-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील आदिवासींना फक्त कोरकू भाषा येत असतानाही जिल्हा- परिषदेच्या शाळेत आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असून या शाळेत कोरकु भाषा न येणारेच शिक्षक कार्यरत असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांचा संवाद होत नसल्याने आदिवासी विद्यार्थी शाळा सोडत असल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांसाठी कोरकु भाषेचे ज्ञान असणाऱ्या शिक्षिकाची नियुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ जून २०१४ चे अधिसूचनेनुसार स्थानिक अनुसूचित जमाती उमेदवारामधून शिक्षण सेवक भरती प्रक्रिया राबवयाची असल्याने तसे मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील सिंचन प्रकल्पांकरिता वन (संवर्धन) अधिनियम शिथिल करणेबाबत**

**(१६) ८९७०५ (१२-०८-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामंडळाचे पत्र क्र.४६५१/ विपाविम/कांता.२ (११/०८) दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ नुसार गडचिरोली जिल्हयातील सिंचन प्रकल्पांकरिता वन (संवर्धन) अधिनियम शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाने मा.राज्यपाल यांना असलेल्या अधिकारांचे (Shedul ५ Of Constitution Of India) अनुषंगाने तुलतुली व कारवाफा प्रकल्पाकरिता सदर प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या एकूण सिंचन क्षमता २,११,१९० हे. क्षेत्रापैकी केवळ ७२,३३१ हे.सिंचन क्षमता असून १९८० च्या वन अधिनियमात शिथिलता मिळाल्यास अतिरिक्त ४९,३९७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होण्यास मदत मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अधिनियमात शिथिलता मिळाल्यास त्याचा सर्वाधिक लाभ स्थानिक आदिवासी, गैर आदिवासी, शेतकरी, मजूर इत्यादींना मिळणार असल्याने अधिनियम शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०२-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, अंशत: खरे आहे.

जिल्हयाची एकुण सिंचन क्षमता १०२७९८ हे. असुन जुन २०१५ अखेर ३२८९५ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. वन अधिनियमात शिथीलता/ सुट मिळाल्यास ९ प्रकल्पातुन ५८८२८ हे. सिंचन क्षमता निर्माण होऊ शकेल.

(४) वन (संवर्धन) अधिनियम १९८० शिथिल करण्याबाबतची बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हा परिषद शिक्षकाच्या विविध मागण्याबाबत**

**(१७) ९०२४२ (२२-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषद शिक्षकाच्या विविध मागण्या प्रशासनाकडे प्रलंबित असून या मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत शाळा उघडायची नाही असा निर्णय शिक्षक कृती समितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद व माध्यमिक इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतच्या जिल्हयात ७४० शाळा असून शाळेत सुमारे ३५०० शिक्षक व ७५ हजार २८७ विद्यार्थी असल्याने शाळा बंद राहिल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार जिल्हा परिषद शिक्षकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) शिक्षक कृती समितीने "काम बंद" करण्याबाबतचे निवेदन जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सादर केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) शिक्षक कृती समिती या संघटनेने काम बंद करण्याबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सादर केले होते. जिल्हा परिषद, भंडारा यांचेस्तरावर शिक्षक संघटनेच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचे पत्र दि.१३/०६/२०१७ अन्वये काम बंद आंदोलन करण्यात येऊ नये असे संघटनेला कळविण्यात आले. त्यानुसार सदर आंदोलन मागे घेण्यात आले व शिक्षकांचे प्रश्न निकाली काढण्याबाबत जिल्हा परिषद, भंडारा यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झाल्टा फाटा परिसरात बांधकामास ग्रामपंचायतीने अनधिकृतपणे परवानग्या दिल्याबाबत**

**(१८) ९०४४२ (२२-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरालगतच्या २८ गांवाकरिता झालर क्षेत्र तयार करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र प्राधिकरण अधिनियम लागू करण्यात आला आहे त्यातील नियमानुसार या भागात कुठलीही विकास कामे करायची असतील तर सिडको तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर रचना विभागांच्या परवानग्या बंधनकारक आहेत परंतु झाल्टा फाटा परिसरात बांधकामास ग्रामपंचायतीने अनधिकृतपणे परवानग्या दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१) होय, खरे आहे

(२) होय. ग्राम पंचायत झाल्टा, ता.जि.औरंगाबाद च्या हद्दीत बेकायदेशीर व अनधिकृतरित्या मंजूर केलेल्या रेखांकनाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती औरंगाबाद यांनी चौकशी करुन सादर केलेल्या दि. ०६.०९.२०१६ च्या अहवालानुसार जिल्हाधिकारी यांचे अकृषीक परवाना, सहायक संचालक, नगर रचना,

औरंगाबाद यांचे रेखांकन मंजूरी न घेता ग्रामपंचायत स्तरावर तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.टी. साळवे व श्री.बी.ए. हलगडे यांनी नियमबाहयरित्या ग्राम पंचायतीच्या मासिक बैठकांमध्ये ठराव घेऊन विकासकांना रेखांकन/बांधकाम परवानग्या दिलेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.टी. साळवे व श्री.बी.ए. हलगडे यांच्यावर दि. ३१.३.२०१७ च्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजावून स्पष्टीकरण मागविण्यात आले. संबंधितांचे स्पष्टीकरण असमाधानकारक असल्याचे आढळून आल्याने तत्कालिन तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.टी. साळवे यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या दिनांक १२.१२.२०१७ च्या आदेशान्वये व श्री.बी. ए. हलगडे यांच्याविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या दि. १५.१२.२०१७ च्या आदेशान्वये विभागीय खातेचौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मौजे वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१९) ९६१०५ (०६-०१-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघेरी (ता.कणकवील, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीला विविध विकास कामांसाठी राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनेंतर्गत सन १९९७ ते २०१६ या कालावधीत किती निधी प्राप्त झाला आहे व सदर निधीचा विनियोग तसेच ग्रामपंचायतीला विविध मार्गाने मिळणा-या महसूली उत्पन्नातून ग्रामपंचायतीच्या सरपंचानी व ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी कोणती विकासात्मक कामे केली आहेत,

(२) असल्यास, मौजे वाघेरी ग्रामपंचायतीमध्ये सन १९९७-९८ ते २००४-०५ या कालावधीत जवाहर रोजगार योजनेत रु.६,५७,८१३ च्या निधीचा अपहार, सन २००४-०५ मध्ये दलितवस्ती सुधार योजनांतर्गत नळपाणी पुरवठा योजनत अंदाजपत्रकीय रक्कम ४ लाख ८७ हजार पैकी ३ लाख ६० हजार ऐवढी रक्कम खर्च करुनही निकृष्ट दर्जाचे काम झाल्याची ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांच्या विरोधात दिनांक २० नोव्हेंबर, २००९ व १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे.वाघेरी ग्रामपंचायतीला उक्त कालावधीत प्राप्त झालेल्या निधीचा व ग्रामपंचायतीकडे जमा झालेला महसूल व योजनांवरील खर्च याचा तपशील व लेखा जोखा यामध्ये सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांनी निधीचा अपहार केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सिंधुदुर्गातील लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सिंधुदुर्ग यांना पत्र पाठवून खर्चाचा तपशील व लेखाजोखा याची सविस्तर मागणी केली असता १ वर्षाचा कालावधी लोटूनही माहिती न मिळाल्याने लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना सदर माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ग्रामपंचायतीला विविध विकास कामाच्या निधीचा अपहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९)** : (१) मौजे वाघेरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीला सन २०००-०१ ते २०१५-१६ या कालावधीमध्ये राज्य शासन व केंद्र शासन यांच्या विविध योजनेअंतर्गत रु.५१,७४,९५७/- इतका निधी प्राप्त झालेला आहे. ग्रामपंचातीला विविध मार्गाने मिळणा-या महसूली उत्पन्नासह रु.६१,०६,९६९/- इतका निधी प्राप्त झालेला आहे. प्राप्त निधीतून ग्रामपंचायतीने विविध योजनांतर्गत अनेक विकासाची कामे केली आहेत.
(२) अंशत: हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींचे दि.२०.११.२००९ व दि.०१.०८.२०१७ चे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग कार्यालयाकडे अढळ होत नाहीत. परंतु जवाहर रोजगार योजनेतील अपहाराबाबतचे लोकप्रतिनिधींनी दि.०५.०५.२०१७ व दि. १५.०५.२०१७ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली आहे.
(३) होय.
(४) मौजे वाघेरी ग्रामपंचायतीमध्ये सन १९९७-९८ ते २००४-०५ या कालावधीत जवाहर रोजगार योजनेत रु.६,५७,८१३/- एवढी रक्कम, मोजमाप नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने आक्षेपीत ठेवण्यात आली. यासंदर्भात चौकशी करुन संबधितांना नोटीसा देण्यात आल्यावर संबधित ग्रामपंचायतींने मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिली असून यामध्ये मुल्यांकनापेक्षा रु.९,२०३/- इतकी अतिरिक्त रक्कम अदा केल्याचे दिसून आले. ही अतिरिक्त रक्कम तत्कालिन सरपंच व तत्कालिन ग्रामसेवक यांचेकडून वसुल करण्यात आली आहे. तसेच स्थानिक निधी लेखा परिक्षणाला तत्कालिन ग्रामसेवक यांनी वेळेवर मोजमाप पुस्तिका सादर न केल्याने मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम १९३० मधील तरतूदीनुसार रु.१००/- इतका दंड आकारुन तो वसुल करण्यात आला आहे.

दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा योजना सन २००४-०५ अंतर्गत ग्रामपंचायतीला एकूण रु.३,६०,०००/- एवढे अनुदान प्राप्त झालेले होते. त्यापैकी रु.३,५१,९५६/- इतका खर्च झालेला आहे. सदर कामापैकी केलेल्या काही कामांचा रु.२८,३७६/- इतक्या रकमेचा मुल्यांकन दाखला उपलब्ध आहे. परंतु सदर कामाची मोजमाप पुस्तिका उपलब्ध नाही. सदर काम करतेवेळी जागेच्या मालकिचा प्रश्न उद्भवल्याने प्रतिवादी श्री.राजेंद्र कदम यांनी ओरोस येथील मे.दिवाणी न्यायालयमध्ये दावा क्र. ०७/२००९ दाखल केल्याने उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,कणकवली यांचेकडून संबधित कामाचे अदयाप मोजमाप करुन मुल्यांकन करणेत आलेले नाही. तथापी सदरच्या योजनेतुन सन २०१० पासुन पाणी पुरवठा सुरळीत चालु आहे.

वाघेरी बौध्दवाडी येथे दलित वस्ती सुधार योजनांतर्गत नळपाणी पुरवठा योजना करणे या कामावर रु.३,२५,०००/- एवढा खर्च मुल्यांकने न घेता करण्यात आला असल्याने जबाबदार असणारे तत्कालिन ग्रामसेवक श्री.एल.जी.रसाळ यांचेवर दि.२५.११.२०१६ च्या आदेशान्वये निलंबनाची कार्यवाही करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला तालुक्यातील चांदूर येथे जिल्हा परिषदेच्या शाळेत शाळा सोडण्याच्या दाखल्याकरिता मुलांकडून शुल्क आकारल्याबाबत**

**(२०) ९८३२५ (२२-१२-२०१७). अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला तालुक्यातील चांदूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मुलांकडून शाळासोडण्याच्या दाखल्याकरिता पाचशे रूपयांची वसूली केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेला पाचशे रूपये देऊनही शाळा सोडण्याचा दाखला दिला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) नाही. कोणत्याही विदयार्थ्यांकडून दाखल्यासाठी पाचशे रुपयांची वसुली करण्यात आलेली नाही.
(२) नाही. शाळा सोडल्याचा दाखल्याकरीता पाचशे रुपये घेण्यात आलेले नाही. पालकांच्या मागण्यानुसार/विनंतीनुसार विदयार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले देण्यात आलेले आहेत.
(३) शालेय रेकॉर्डनुसार कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नसल्यामुळे याबाबत चौकशी झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील प्राथमिक आरोग्य व उपकेंद्रातील आरोग्य परिचर व सेविकांच्या मागण्याबाबत**

**(२१) १०७३६८ (०९-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील प्राथमिक आरोग्य व उपकेंद्रातील आरोग्य परिचर व सेविकांनी मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांना मागण्यांकरिता दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०२-२०१९) :** (१) होय.
(२) राज्यातील अर्धवेळ/ अंशकालीन स्त्रीपरिचरांच्या मानधनात वाढ करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रस्ताव सहमतीसाठी या विभागाकडे पाठविला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्धवेळ/ अंशकालीन स्त्रीपरिचरांच्या मानधनात वाढ करण्यास विभागाने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाकडे चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) ग्रामपंचयातीच्या महिला व पुरुष कर्मचारी वर्गास थकीत वेतन मिळण्याबाबत**

**(२२) १०८२०३ (०६-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) ग्रामपंचयातीच्या महिला व पुरुष कर्मचारी वर्गाने थकीत वेतन मिळावा याकरिता दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागण्यानुसार ग्रामपंचायतीच्या महिला व पुरुष कर्मचारी वर्गास थकीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
ग्रामपंचायत, सोनई ता. नेवासा येथे आकृतीबंधानुसार ६ ग्रामपंचायत कर्मचारी कार्यरत असून ग्रामपंचायतीचे १४ कायम व १८ रोजंदारीवर असे एकूण ३२ कर्मचारी नियुक्त आहेत.

आकृतीबंधाबाहेरील ग्रामपंचायत कर्मचा-यांनी माहे जुलै २०१७ व ऑगस्ट २०१७ या कालावधीचे वेतन मिळणेकरिता दि.१२.०९.२०१७ पासून ६ दिवसांचे उपोषण केले.
(२) ग्रामपंचायतीने घरपट्टी व पाणीपट्टी वसूली करून ग्रामनिधी संदर्भात कार्यक्रम निश्चित करून पुरेसे अनुदान उपलब्ध करून माहे जून व जुलै, २०१७ मधील वेतन माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये तसेच माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ मधील ऑक्टोबर, २०१७ मध्ये अदा केले आहे. आज रोजी ग्रामपंचायत कर्मचारी यांचे वेतन प्रलंबित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विभागातील जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागातील**
**शाखा अभियंत्याने केलेला गैरव्यवहार**

**(२३) १०८७२० (०९-०४-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागातील शाखा अभियंताविरुदध गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल असूनही त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून ज्या प्रकारचे गुन्हे अधिका-यावर दाखल आहेत त्याच प्रकारची कामे त्यांना देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथिल उपविभागीय अधिकारी रामटेके यांनी गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल असतांना शाखा अभियंत्याला जिल्हापरिषद सर्कल मन्स्र, कांद्री, भांडाळबोंडी येथील काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) संबंधित शाखा अभियंता यांनी शासकीय रकमेचा अपहार केल्यामुळे त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केल्याने त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर यांनी दि. ३१.१०.२००७ च्या आदेशान्वये निलंबित केले. मात्र, शासन निर्णय दि. १४ ऑक्टोबर,२०११ नुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांनी निलंबनाचा आढावा घेवून संबंधित शाखा अभियंत्याला जिल्हा परिषद नागपूर मधील पाणी पुरवठा विभागात अकार्यकारी पदावर, न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून पदस्थापना दिलेली आहे.

---

**राज्यात बोगस विद्यार्थी संख्या दाखवून कौशल्य प्रशिक्षण**
**देणा-या संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत**

**(२४) ११००५७ (१७-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय कौशल्य विकास योजनेअंतर्गत अनेक खाजगी संस्थांमार्फत कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी संस्थांनी ग्रामीण भागातील तरुणांना मोफत कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविणे व त्यातील किमान ७५% युवकांना रोजगार मिळवून देणे अंतर्भूत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३ वर्षात या योजनेत किती खाजगी कंपन्याना काम दिले गेले प्रत्येक वर्षी किती युवकांना प्रशिक्षण मिळाले व त्यातील किती तरुणांना रोजगार मिळाला व किती तरुणांना स्वयंरोजगार मिळाला याबाबत अदययावत माहिती कौशल्य विकास विभागाकडे नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कौशल्य विकास विभागामार्फत सदर प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांकडे कौशल्य अभ्यासक्रमासाठी अद्ययावत पायाभूत सुविधा, तंत्रज्ञ व शिक्षक असल्याबाबतची पाहणी व निष्कर्ष बंधनकारक करण्यात येऊन अभ्यासक्रमांस परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, कौशल्य अभ्यासक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने रजिस्ट्रेशन करून भोजन, निवास खर्च व मानधन परस्पर खात्यावर जमा करण्यास बंधनकारक करण्यासह राज्यात बोगस विद्यार्थी संख्या दाखवून कौशल्य प्रशिक्षण देणा-या संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
दीन दयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण दिले जाते व त्यातील किमान ७०% प्रशिक्षणार्थींना रोजगार मिळवून दिला जातो.
(३) नाही. हे खरे नाही. दीन दयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजना ही केंद्र पुरस्कृत योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येते.

| वर्ष | प्रशिक्षण देण्यात आलेले लाभार्थी | रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेले लाभार्थी |
|---|---|---|
| २०१६-१७ | ६०४४ | ४१७० |
| २०१७-१८ | ४८३९ | ४०५२ |
| २०१८-१९ | २१०० | १९५६ |
| एकूण | १२९३३ | १०१७८ |

(४) दीन दयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यातील ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येते. ही योजना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच SoP (Standard Operating Procedures) नुसारच राबविणे संस्थांना बंधनकारक आहे. संस्थेला सदर योजना राबविण्यासाठी सर्व प्रक्रिया ही ऑनलाईनच करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच SoP नुसार संस्था पात्र ठरत नसतील तर सदर संस्थांना योजना अंमलबजावणीचे काम दिले जात नाही.
(५) १. कौशल्य विकास अभ्यासक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौशल्य पंजी या ॲपवर नोंदविले जाते. तसेच ऑनलाईन MPR (Monthly Progress Report) मध्ये नोंदविले जाते.

२. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच SoP (Standard Operating Procedures) नुसारच ज्या बाबी या विद्यार्थ्यांच्या खात्यात परस्पर जमा करणे बंधनकारक आहेत त्या बाबी केल्या जातात. (One time traveling cost, Salary etc.).

३. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच SoP (Standard Operating Procedures) नुसार प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात ABAES (Aadhar Based Attendance Enabled System) बसविणे बंधनकारक आहे. आजतागायत बोगस विद्यार्थी संख्या दाखवून कौशल्य प्रशिक्षण देणारी संस्था सदर योजनेत निदर्शनास आलेली नाही. परंतु तसे आढळल्यास केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच SoP नुसार सदर संस्थांवर कार्यवाही केली जाईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वरळी बीडीडी चाळीत राहणा-या पोलीस कुटुंबाना पुनर्विकासानंतर घरे मालकी हक्काने देण्याबाबत

**(२५) ११२०५३ (०३-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी बीडीडी चाळीत गत ३० वर्षे राहणा-या पोलीस कुटुंबाना पुनर्विकासानंतर तीच घरे मालकी हक्काने देण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकषाच्या अनुषंगाने पोलिस वसाहतीत तीन पिढ्या राहणारी पोलिस कुटुंबे आणि शासकीय कर्मचारी वसाहतीत राहणारे कर्मचारी यांनाही ते राहतात त्या वसाहतीचा पुनर्विकास करून मालकी हक्काची घरे देण्याबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१), (२), (३) बी.डी.डी.चाळीच्या पुनर्विकासासाठी पात्रतेच्या संदर्भात व इतर विषयाबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.०१.२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत “बी.डी.डी. चाळीच्या जमिनीवर गृह विभागाच्या ताब्यात असलेल्या व पोलीस निवासस्थाने म्हणून वितरीत करण्यात आलेल्या सुमारे २९०० गाळ्यांबाबत” या मुद्याबाबत “बी.डी.डी.चाळ पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाने आवश्यक संक्रमण गाळे गृह विभागास हस्तांतरित करावे व गृह विभागाने बी.डी.डी.चाळीतील गाळे रिक्त करुन म्हाडाच्या ताब्यात पुनर्विकासासाठी द्यावेत. पुनर्विकास पुर्ण झाल्यानंतर म्हाडाने पुनर्वसित गाळे (पोलीसांच्या सेवासदनिका इतके) गृह विभागास हस्तांतरित करावे व गृह विभागातर्फे पुनर्वसन गाळ्यांचे वितरण करण्यात यावे. पुर्नवसन गाळे वितरीत करणे प्रकरणी गृह विभागाने नियमावली/पात्रतेचे निकष निश्चित करावेत” असा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषद प्रशासनाच्या दुर्लक्षितेमुळे निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२६) ११३४२४ (०६-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावाचा विकास करण्यासाठी सन २०१५ पासून केंद्र शासनाचा १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन जिल्हा परिषदांमार्फत ग्रामपंचायतींना निधी वितरीत केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेस सन २०१५-१६ मध्ये ९५ कोटी ९८ लक्ष रूपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील १३ तालुकांमधील विविध ग्रामपंचायतींना माहे डिसेंबर, २०१७ अखेर फक्त ३२ कोटी ५३ लक्ष रूपये खर्च करण्यात आले मात्र पुणे जिल्हा परिषदेच्या दुर्लक्षितेमुळे ३ वर्षात १९५ कोटींचा निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) पुणे जिल्हा परिषदेस सन २०१५-१६ मध्ये १४ व्या वित्त आयोगांतर्गत रु.९५,६५,४२,७७५/- इतका निधी प्राप्त झालेला आहे.

(३) सन २०१५-१६ चा निधी प्रत्यक्षात जानेवारी २०१६ मध्ये ग्रामपंचायतींना प्राप्त झाला. योजनेच्या अंमलबजावणीची मार्गदर्शक तत्त्वे व सूचना नवीन असल्याने त्याबाबतची परिपूर्ण माहिती घेऊन निधी खर्च करावयाचा असल्यामुळे विलंब झाला. योजनेतील निकषानुसार ग्रामसभेच्या आराखड्यात वारंवार झालेले बदल तसेच प्रत्यक्ष कामांवर अंमलबजावणीचेवेळी जागेच्या अडचणी उपस्थित झाल्यामुळे सदरचा निधी अखर्चित राहीला.

(४) जिल्हा परिषद स्तरावरुन पंचायत समितींना त्याचे अधिनस्त असलेल्या ग्रामपंचायतींना १४ व्या वित्त आयोगाचा प्राप्त झालेला निधी जास्तीत जास्त खर्च करणे बाबत सूचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्या खोटया सहया करून जिल्हा परिषद शाळांमधील २१ शिक्षकाच्या जिल्हा अंतर्गत बदल्या केल्याबाबत

**(२७) ११३८३६ (११-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्या खोटया सह्या करून जिल्हा परिषद शाळांमधील २१ शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या केल्या असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिका-यांच्या नावाने बनावट दस्ताऐवज तयार करून २० प्राथमिक शिक्षक व १ उपशिक्षिका अशा २१ जणांच्या बदल्या केल्याचे कागदपत्राआधारे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या आदेशाने प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४७१ अन्वये फसवणूकीचा गुन्हा दाखल केला असून अद्यापपर्यंत दोषींवर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रायगड यांना फौजदारी गुन्हा दाखल करण्यास प्राधिकृत करण्यात आले असून, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सदर प्रकरणाबाबत अलिबाग पोलिस ठाणे येथे फौजदारी गुन्हा दाखल केला असून, सदर विषय पोलिस निरिक्षक, अलिबाग पोलीस ठाणे यांच्या अंतर्गत असून, चौकशी चालू आहे.
(४) सदर प्रकरणी संबंधित कर्मचा-यांस निलंबत करण्यात आले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी सर्व संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी ज्ञापन व दोषारोप बजाविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हा परिषदेंतर्गत १३ व्या वित्त आयोगातील शेतकरी वृक्ष लागवड कार्यक्रमातील अपहाराबाबत

**(२८) ११४१०२ (१०-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय उपआयुक्तांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी (जि.परभणी) यांना सन २०१५-१६ चे वृक्ष लागवडीमधील अपहाराबाबत फेर चौकशी करण्याचे आदेश दिलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, अहवालानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. उप आयुक्त (विकास) यांनी दिनांक १४.०१.२०१७ च्या पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या प्रकरणी अनुषंगीक तपासणी/चौकशी विनाविलंब करून अहवाल १५ दिवसांत पाठविण्याबाबत कळविले होते. फेरचौकशी करण्याचे आदेश दिलेले नव्हते.
(२) १५ दिवसांत अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते.
(३) प्रस्तुत प्रकरणात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने चौकशी करून दिनांक २९.१०.२०१५ अन्वये अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या कडे सादर केलेला आहे. अहवालातील निष्कर्षाचे अनुषंगाने तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांच्या विरूद्ध दोषारोप प्रस्ताव जिल्हा परिषद परभणी यांच्याकडून सादर करण्यात आला आहे. तसेच पंचायत समिती, जिंतूर अंतर्गत तीन ग्रामसेवकांवर कर्तव्यात कसूर केल्यामुळे व एक विस्तार अधिकारी (पंचायत) यांचेविरूद्ध ग्रामसेवकांच्या कामकाजावर संनियंत्रण न ठेवल्यामुळे विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांना मानधन देण्याबाबत**

**(२९) ११६७०३ (२०-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांना महिन्याकाठी होणा-या मासिक सभेत फक्त २०० रू. मानधन देवून ग्रामपंचायत सदस्यांची उपेक्षा करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना प्रवास भत्ता तसेच सरपंचानाही वार्षिक उत्पन्नाप्रमाणे मानधन मिळत असुन ग्रामपंचायत सदस्यांना अतिशय कमी प्रमाणात मानधन दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच सरपंचांना मिळणा-या मानधनाप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) ग्रामपंचायत सदस्यांना मानधन दिले जात नसून फक्त बैठक भत्ता दिला जातो. शासन निर्णय दि. २१/०१/२००० नूसार तो प्रति बैठक रु.१०/- एवढा निश्चित करण्यात आला होता. शासन निर्णय दि. २७/०७/२००९ नूसार तो प्रति बैठक रु.२५/- व शासन निर्णय दि. ०६/०९/२०१४नूसार तो प्रति बैठक रु. २००/- एवढा वाढविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारला-चिरोडी (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३०) ११८८७३ (३०-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारला-चिरोडी (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) या जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित चिरोडी ते कारला हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. ७७ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ४/५०० कि.मी. आहे.

या रस्त्याच्या सा.क्र. ०/४०० ते ४/०० मध्ये काही प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यापैकी सा.क्र. १/०० ते २/६०० ह्या १.६०० कि.मी. रस्ता सुधारण्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत गैरआदिवासी योजना लेखाशिर्ष ५०५४-४१५७ अंतर्गत मंजूर आहे.

उर्वरीत खराब रस्ता सुधारण्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या जिल्हयांतर्गत बदलीसाठी काढलेल्या अध्यादेशाबाबत**

**(३१) ११९०८८ (२४-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या जिल्हयांतर्गत बदलीसाठी दिनांक २७ फेब्रुवारी,२०१८ रोजी शासनाने अध्यादेश काढल्याने सुगम व दुर्गम भागांतील शिक्षकांत असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीसाठी नवीन धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शासन निर्णय दि.२७ फेब्रुवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सुगम व दुर्गम भाग घोषित करण्याची कार्यवाही संपूर्णतः संबंधित जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर होती. ज्यांना सुगम-दुर्गम क्षेत्राबाबत आक्षेप होते त्या शिक्षकांना सक्षम प्राधिका-यासमोर अपिल करण्याची तरतूद सदर शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देण्याबाबत**

**(३२) ११९०९० (२०-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयात वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ नागरीकांना देण्यासाठी मुख्यालयातून डीबीटी (थेट हस्तांतरण) करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी गत आर्थिक वर्षात पहिल्यांच राबविलेल्या डीबीटी योजनेअंतर्गत (लाभार्थाच्या खात्यावर थेट पैसे जमा करणे) अद्याप जिल्हयातील एकही व्यक्तीच्या खात्यावर अनुदान जमा झाले नसल्याचे दिनांक ०४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास पुणे जिल्हा परिषदेच्या स्थायी समीतीच्या सभेत निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सर्व लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१) वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ नागरीकांना देण्यासाठी डीबीटी व्दारे थेट हस्तांतरणकरण्याचा महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय दि. ०५ डिसेंबर, २०१६ अन्वये पुणे जिल्हा परिषदेने अंमलबजावणी करणेत आलेली आहे.

(२) शासन निर्णयानुसार डिबीटी व्दारे वैयक्तिक योजनांचा लाभ देणेसाठी दि. ३१/०३/२०१८ रोजी लाभार्थ्यांची यादी व निधी RTGS/NEFT व्दारे वर्ग करणेचे पत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस देणेत आलेले होते. लाभार्थ्यांची संख्या जास्त असलेने व अर्थिक वर्षाखेरीस कामामुळे तसेच लाभार्थ्यांची बँक बाबतची अपुर्ण माहिती इ. कारणामुळे लाभाच्या रकमा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणेस थोडा विलंब झालेला आहे.

(३) वैयक्तिक लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करणेत आलेला असलेने प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा येथे शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेबाबत

**(३३) ११९४१५ (२४-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथे शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रिया राबविताना मोठी अनियमितता झाली असून पारदर्शक पध्दतीच्या नावाखाली अनेक शिक्षकांच्या चूकीच्या बदल्या झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात येथील शिक्षकांनी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा यांना दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या निवेदनानुसार उक्त बदल्या रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दि.१२/५/२०१८ रोजीच्या बदली आदेशात आढळून आलेल्या त्रुटीमुळे दि.२८/५/२०१८ रोजी बदल्यांचे सुधारित आदेश देऊन त्रुटी दूर केल्या आहेत. शिवाय विभागीय आयुक्तांकडील सुनावणीत शिक्षकांच्या तक्रारीतील मुद्दांमध्ये तथ्य आढळून आलेले नाही. त्या तक्रारी खारीज केलेल्या आहेत. संपूर्ण बदली प्रक्रिया दि.२७/२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयात जिल्हा नियोजन समितीच्या नाविण्यपूर्ण योजनेद्वारे सीसीटीव्ही व संगणक खरेदीत केलेला गैरव्यवहार**

**(३४) ११९८५४ (३१-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी व जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१५-१६ मध्ये जिल्हयातील ७ पंचायती समिती स्तरावर, जिल्हा नियोजन समितीच्या नाविण्यपूर्ण योजनेद्वारे सीसीटीव्ही व संगणक खरेदी प्रकरणात, झालेल्या विभागीय चौकशी मध्ये दोषी आढळून आल्याने त्यांचेविरुध्द शिस्त भंगाची कारवाई करण्याचे निदेश अमरावतीच्या विभागीय आयुक्तांनी दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, सदर प्रकरणी मा.मंत्री, ग्राम विकास यांनी दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने दिनांक ३१/५/२०१७ अन्वये अहवाल शासनास सादर केला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी हे भा.प्र.से संवर्गातील अधिकारी असल्याने सामान्य प्रशासन विभागाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला असता त्यांनी काही त्रुटी दर्शवून प्रस्ताव या विभागाकडे परत पाठविला आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई उरण - पनवेल सिडको प्रकल्पग्रस्त प्राथमिक शिक्षक व कर्मचा-यांना जिल्हा परिषद शाळांमध्ये प्राधान्याने सामावून घेण्याबाबत**

**(३५) १२०२३९ (२०-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई उरण - पनवेल सिडको प्रकल्पग्रस्त प्राथमिक शिक्षक व कर्मचा-यांना सिडको हद्दीतील जिल्हा परिषद शाळांमध्ये प्राधान्याने सामावून घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा अंतर्गत सर्वसाधारण बदल्यांबाबतच्या धोरणात सुधारणा न केल्यामुळे प्रकल्पग्रस्त प्राथमिक शिक्षकांना सिडको हद्दीतील जिल्हा परिषद शाळांमध्ये सामावून घेण्यास अडचणी येत आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको प्रकल्पग्रस्त शिक्षक व कर्मचाऱ्यांना सिडको हद्दीत जिल्हा परिषद शाळांमध्ये प्राधान्याने सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय.
(२), (३) व (४) ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/ आस्था-१४, दिनांक २७/०२/२०१७ मध्ये प्रकल्पग्रस्त प्राथमिक शिक्षकांना सिडको हद्दीतील जिल्हा परिषद शाळांमध्ये सामावून घेण्याबाबत तरतूद नाही. सदरचा शासन निर्णय हा जिल्हा अंतर्गत शिक्षकांच्या बदल्यांपूरता मर्यादित आहे.

---

## राज्यात १४ व्या वित्त्त आयोगामार्फत मिळणा-या निधीतून होणा-या कामाच्या अंमलबजावणीचे सर्वाधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आल्याबाबत

**(३६) १२१२०४ (२४-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १४ व्या वित्त्त आयोगामार्फत मिळणा-या निधीतून होणा-या कामाच्या अंमलबजावणीचे सर्वाधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंमलबजावणीचे सर्वाधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्याने गावाला मिळणारा थेट निधीच्या खर्चावर बंधन येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंचायत समिती कळंब (जि.उस्मानाबाद) येथे पूर्णवेळ गटविकास अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(३७) १२१६७१ (३०-०७-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब, पंचायत समिती कळंब (जि. उस्मानाबाद) येथे सन २०१३ पासून माहे जून २०१७ पर्यंत १५ वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी या पदावर प्रभारी म्हणून काम केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु पंचायत समितीस पूर्णवेळ गटविकास अधिकारी नसल्याने विकास कामांमध्ये अडचणी निर्माण होत असल्याने पूर्णवेळ गटविकास अधिकारी देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार कळंब पंचायत समितीत पूर्णवेळ गटविकास अधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) शासन आदेश क्र.मविसे-१०१८/प्र.क्र.७१ (भाग-१)/२०१८/आस्था-३, दिनांक ३०.०७.२०१८ नुसार श्री.एन.पी.राजगुरू यांची नियमित गट विकास अधिकारी, पंचायत समिती कळंब या रिक्त पदावर करण्यात आलेली असून ते सदर पदावर दिनांक २३.०८.२०१८ रोजी उपस्थित झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत येणा-या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३८) १२१७१६ (२४-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील लोहारा-कुसुंबा-उटखेडा-विवरे खु. इजिमा-१६, मारूळ-भालोद-हंबर्डी-भालोद-पिळोदा इजिमा-११, चिनावल-विवरे खु.-अजंदा इजिमा-२१ हे रस्ते वाहतुकीस अत्यंत खराब असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्यांची पाहणी करण्यात आली असून प्रश्नाधिन इजिमा-१६, इजिमा-११ व इजिमा-२१ या रस्त्यांच्या खराब लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) लोहारा कुसुंबा उटखेडा विवरे बु इजिमा-१६ या रस्त्याचे लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत १/०० ते २/०० कि.मी. व १०/९०० ते ११/९०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे रु.३८.२१ लक्षचे काम मंजूर असून कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

मारुळ हंबर्डी भालोद पिळोदा इजिमा-११ या रस्त्याचे लेखाशिर्ष ५०५४ अंतर्गत ८/०० ते ९/०० कि.मी लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे रु.२०.०० लक्षचे काम मंजूर असून कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

चिनावल विवरे खु.अजंदा या इतर जिल्हा मार्ग क्र. २१ या रस्त्याच्या खराब लांबीचे व इजिमा १६ व ११ या रस्त्यांच्या उर्वरीत खराब लांबीची दुरुस्ती अनुदानाच्या उपवब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कुर्झे (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये विकासकामात झालेला गैरव्यवहार

**(३९) १२२१२४ (३१-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्झे (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये गवळीपाडा या पाडयातील जुनी विहीर दुरुस्ती करण्यासाठी सन २०१५-१६ वर्षासाठी चौदाव्या वित्त आयोग निधीतून ७२.३८५ रुपये मंजूर करण्यात आला होता परंतु विहीर दुरुस्त न करताच संपूर्ण रक्कमेचा अपहार झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रायगड जिल्हा परिषद मधील सार्वजनिक बांधकाम विभागातील रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांची स्थायी नियुक्ति करण्याबाबत

**(४०) १२२७६३ (२८-०७-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेमधील सार्वजनिक बांधकाम विभागात १८ सफाई कर्मचारी गत १० ते १२ वर्ष रोजंदारीवर काम करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सफाई कर्मचारी हे स्थानिक असून ते १० वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे व त्यांना नोकरीत कामयस्वरूपी सामावून न घेतल्यास त्यांची नोकरीकरीता आवश्यक असणारी वयोमर्यादा निघून जावून त्यांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रोजदारीवर काम करणा-या सफाई कामगारांची स्थायी नियुक्ति करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) ४ सफाई कामगार १० वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.
(३) व (४) सदर मजूर रोजंदारी तत्वावर (हातपावती) काम करीत असल्याने त्यांना कायम करण्यात आले नाही.

---

**भडगांव (जि.जळगांव) येथील गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याविरूध्द कामकाजाविषयी प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत**

**(४१) १२३२८३ (३०-०७-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव (जि.जळगांव) येथील गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या संदर्भात दिनांक २७ एप्रिल,२०१८ रोजी झालेल्या मासिक सभेत त्यांच्या कामकाजाविषयी असलेल्या तक्रारीनुसार ठराव क्र.११५ सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या ठरावात तात्काळ बदली करण्याचा ठराव संमत करण्यात आला असून याबाबत दिनांक १६ मे,२०१८ रोजी वा त्या सुमारास मा. ग्रामविकास राज्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय.
(२) अंशत: खरे.
दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या मासिक सभेत आयत्या वेळेच्या विषयात विषय क्र.८ नुसार गट विकास अधिकारी यांच्या कामकाजाविषयी असलेल्या तक्रारीनुसार ठराव क्र.११५ नुसार अविश्वास ठराव संमत करण्यात आला. सदर ठराव तात्काळ बदली करण्याबाबत नाही.
तथापि श्री.गिरीष महाजन, मा.मंत्री, जलसंपदा यांच्या दिनांक निरंकच्या पत्रान्वये, श्रीमती डी.ए.कोतवाल, गट विकास अधिकारी, पंचायत समिती भडगाव, जिल्हा जळगाव यांची तक्रारी बदली करणेबाबत कळविले आहे.
(३) सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हापरिषदेतंर्गत येणाऱ्या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(४२) १२३९५६ (२८-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हापरिषदेतंर्गत येणाऱ्या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचारी गत चार महिन्यापासून वेतनापासून वंचित असल्याची बाब दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना तात्काळ वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, अनुदान प्राप्त नसल्याने वेतन अदा करण्यास विलंब झाला होता. दि.२०.६.२०१८ रोजी थकीत वेतन अदा करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला तालुक्यातील चांडस ते नाबली रस्त्याच्या कामाबाबत**

**(४३) १२४१९२ (२०-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला लोकसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचनेनुसार चांडस ते नाबली रस्त्याची पाहणी केली असता रस्त्याचे काम नव्याने करून कंत्राटदार व संबंधीत अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आश्वासन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार रस्त्याचे काम नव्याने करण्यासह कंत्राटदार व संबंधीत अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेमार्फत जून २०१८ अखेरपर्यत कोणतेही काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे कंत्राटदारावर अथवा अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगडनगर चिमनबारी (ता.जि.नाशिक) या आदिवासी गावाला पाण्यासह विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(४४) १२८१२२ (१०-१२-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-आग्रा महामार्गावर असणाऱ्या रायगडनगर चिमनबारी (ता.जि.नाशिक) या आदिवासी गावाला पाण्यासह विविध प्रश्नांनी ग्रासले असून विकासाच्या योजना आणि ग्रामसभा फक्त कागदोपत्रीच राबवली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत असून ग्रामपंचायतीच्या गैरकारभारासह संपूर्ण चौकशी करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर आदिवासी गावाला पाण्यासह शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) नाही.

याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून अहवाल घेतला असता रायगडनगर चिमनबारी ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, दि. ०३.०९.२०१८ रोजी पंचायत समिती, नाशिक या कार्यालयात अध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र व अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद व ग्रामस्थ रायगडनगर चिमणबारी, ता.जि. नाशिक यांचे अन्य मुद्यांबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) होय.

अध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र व अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद व ग्रामस्थ रायगडनगर चिमणबारी, ता.जि.नाशिक यांचे निवेदनावर तसेच सदर तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे. त्यानुसार रायगडनगर (चिमणबारी) गांवाची लोकसंख्या १०९८ आहे. गांवात पिण्याच्या पाण्यासाठी नळपाणी पुरवठा योजना-१ , बोअरवेल-१ व सार्वजनिक विहिरी-२ असून गावाला नियमित पाणी पुरवठा केला जातो. तसेच शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीमध्ये नियमित ग्रामसभा घेण्यात आल्या आहेत. रायगडनगर ग्रामपंचायतीचे सन २०१५-१६ अखेरचे स्थानिक निधी लेखा विभागाकडून लेखा परीक्षण करण्यात आले असून लेखा परीक्षणात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याबाबतच्या नोंदी नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ पंचायत समिती (जि.कोल्हापूर) येथील मैलकामगारांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) १२८१७७ (०७-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ पंचायत समिती (जि.कोल्हापूर) येथील मैलकामगारांचे माहे मार्च-एप्रिल, २०१८ चे वेतन अद्यापपर्यंत दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार कामगारांना तात्काळ पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) पंचायत समिती, शिरोळ, (जि.कोल्हापूर) उपविभागाकडील माहे मार्च-एप्रिल, २०१८ या कालावधीतील कार्यरत मैलकामगारांची संख्या १० होती. माहे मार्च- २०१८ चे वेतन उपविभाग शिरोळ वित्त विभागाकडील प्रमाणक क्र.३ दि.५.६.२०१८ रक्क्म रूपये २४८८१४/- (अक्षरी -दोन लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे चौदा रूपये) व माहे एप्रिल-२०१८चे वेतन प्रमाणक क्र.४ दि.५.६.२०१८ रक्कम रूपये २४५८९८/- (अक्षरी-दोन लाख पंचेचाळीस हजार आठशे अठठयान्नव रूपये) अन्वये मैल कामगारांना वेतन अदा करणेत आले आहे.सद्यस्थितीत या कामगारांचे वेतन प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४६) १२८६३८ (१०-१२-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने गैरव्यवहार करणाऱ्या एका व्यक्तीला वाचविण्यासाठी अनेक वर्ष चालविलेल्या गैरकारभाराबाबत दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी उपआयुक्त आस्थापना कोकण विभाग, नवी मुंबई यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी सिंधुदुर्ग यांना कारवाईचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्देशाच्या अनुषंगाने अद्याप गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) उप आयुक्त (आस्थापना), कोकण विभाग, नवी मुंबई यांनी श्री.सुरेश पेडणेकर, राहणार वरळी यांच्या तक्रार निवेदनातील नमूद बाबीसंदर्भात नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदार यांना अवगत करावे असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना दिनांक २७ ऑगस्ट २०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तूत तक्रारीच्या अनूषंगाने संबधित तक्रारदार व गट विकास अधिकारी पं. स. कणकवली तसेच ग्रामपंचायत घोणसरी यांची सुनावणी दिनांक २५/१०/२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडे घेण्यात आली. ग्रामपंचायत घोणसरी गट नं.१६५५, १६५६ व १६७२ मधुन जाणारी गोवंड/पायवाट हिची नोंद चुकीची तसेच बेकायदेशीर तसेच न्यायालयाचा अवमान करणारी आहे. तरी नोंद कमी करण्याबाबत तक्रार श्री.सुरेश पेडणेकर यांनी केली होती. तथापि, ग्रामपंचायत घोणसरी गट नं.१६५५, १६५६ व १६७२ मधुन जाणारी गोवंड/पायवाट हिची नोंद ही मे.दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यामध्ये कोर्ट कमिशनरने केलेल्या मोजणीमध्ये व त्यानुसार ग्रामपंचायत मासिक सभेत केलेल्या ठरावानुसार केलेली आहे. सदर निर्णय संबधित तक्रारदार श्री.सुरेश पेडणेकर यांना कळविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिठमुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीच्या सरपंचानी अधिकाराचा दुरूपयोग करून केलेला गैरव्यवहार

**(४७) १३०९६८ (१०-१२-२०१८). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिठमुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) खाडीच्या मुखाजवळील (नस्तर)सरकारी जमिनीवर श्री.रमेश तारी व अन्य यांनी सीआरझेडचे उल्लंघन करून गोडावून सदृष्य भव्य व्यावसायिक वापरासाठी अनधिकृतरित्या माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या बांधकामास सरपंच ग्रामपंचायत मिठमुंबरी यांनी अधिकाराचा दुरूपयोग करून बेकायदेशिररित्या माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाणीवपूर्वक ग्रामपंचायतीचा घर क्रमांक देवून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,ग्रामपंचायत हद्दीतील बेकायदा व अनधिकृत बांधकामे ग्रामपंचायतीने, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम (५३२ अन्वये) विनाविलंब निष्कासित करणे बंधनकारक असतानाही शासकीय जमिनीवर सीआरझेडचे उल्लंघन करून श्री.रमेश तारी यांनी मिठमुंबरी खाडीच्या मुखाजवळील भागात सदरहू गोडावून सदृष्य भव्य व्यावसायिक वापरासाठी अनधिकृतरित्या बांधलेल्या बांधकामास ग्रामपंचायत घर क्रमांक दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व त्याला पाठीशी घालणाऱ्या सरपंचावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

तथापि प्रस्तुत तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने पाहणी केली असता खाडी किनारी चिरे/जांभा दगड व पत्रे याचा वापर करुन ५० फूट लांब व १६.०२ फुट रूंदीची बंदिस्त इमारत बांधकाम केल्याचे आढळते. याबाबत ग्रामपंचायत दप्तरी गोडावून स्वरुपात इमारतीची नोंद करण्यात आलेली नाही किंवा कोणत्याही प्रकारे गोडावून स्वरुपात इमारतीस नंबर देण्यात आलेला नाही. सदर इमारतीबाबत श्री. रमेश तारी व इतर यांनी नोंद करण्याबाबत ग्रामपंचायतीस विनंती केली नाही. तसेच त्यांना ग्रामपंचायतीमार्फत परवानगी देण्यात आलेली नाही. तथापि, सदर इमारत कोणाची आहे याबाबत ग्राम पंचायत मार्फत खातरजमा करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे ग्रामपंचायत मीठमुंबरीने कळविलेले आहे .
(३) सदर प्रकरणी ग्रामपंचायत मिठमुंबरी यांना आवश्यक ती नियमानुकुल कारवाई करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी दि. १९/११/२०१८ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यात मुद्रा कर्ज योजनेत विषमता असल्याबाबत

**(४८) १३३५१० (०४-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुद्रा योजनेअंतर्गत रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी चालू वर्षात आतापर्यंत ५ हजार २६९ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून कर्जवाटपाचा सर्वाधिक वाटा हा औद्योगिकदृष्ट्या विकसित जिल्ह्यांनीच घेतला असल्याने मागास जिल्हे यापासूनही वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेविषयी माहितीच्या प्रसाराचा अभाव, कर्जवाटपाविषयी बँकांची उदासीनता, कर्जाची थकबाकी या सर्व गोष्टी कारणीभूत आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समस्यांचे निवारण करुन मागास जिल्ह्यांना विकसित करण्याकरीता सदर जिल्ह्यांना कर्जाचे योग्य प्रमाणात वाटप होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०२-२०१९) :** (१) मुद्रा बँकेकडून प्राप्त माहितीनुसार प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षात दिनांक १२.१२.२०१८ अखेर रुपये १३२२३.५१ कोटी रुपयांचे कर्ज २४,४३,६३१ लाभधारकांना मंजूर करण्यात आले असून रुपये १२७६१.४१ कोटी इतकी रक्कम कर्ज खातेधारकांना विविध बँकांकडून वितरीत करण्यात आली आहे. मुद्रा बँकेकडून जिल्हानिहाय उपलब्ध करुन दिलेल्या आकडेवारीनुसार उद्दिष्टपूर्तीच्या क्रमवारीत नांदेड, सोलापूर, लातूर हे राज्यात पहिल्या तीन क्रमांकात येतात.

(२) व (३) मुद्रा बँकेमार्फत राबविण्यात येणारे प्रधानमत्री मुद्रा योजनेंतर्गत ग्रामीण, दुर्गम आणि अतिदुर्गम भागात प्रभावीपणे माहिती होण्यासाठी तसेच या योजनेचा लाभ गरजू आणि होतकरु व्यक्ती बेरोजगार यांना व्हावा या हेतूने नियोजन विभागाच्या दिनांक १४.६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच याबाबत राज्यस्तरावरुन आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय संनियंत्रण समितीचे गठन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेच्या माहितीचा प्रचार व प्रसिध्दी केंद्र शासन, राज्य शासन अग्रणी बँकांद्वारे व ग्रामीण बँकाद्वारे चालविली जाणारी आर्थिक साक्षरता केंद्रे तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व बँकांच्या ग्रामीण व शहरी शाखाद्वारा घेतल्या जाणाऱ्या पतपुरवठा सभा यांच्याद्वारे सातत्याने केला जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील बौध्दवाडी-मराठवाडी ह्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण जिल्हा परिषदेकडून अद्याप झाले नसल्याबाबत**

**(४९) १३४७४२ (०७-१२-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) हे गाव सह्याद्रीच्य पायथ्याशी वसले असून अत्यंत दुर्गम भागात आहे मात्र येथील ग्रामस्थांकडून सातत्याने मागणी करुनही बौध्दवाडी-मराठवाडी ह्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण जिल्हा परिषदेकडून अद्याप झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणच्या रस्त्याचे काम दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजीच्या पत्रानुसार रोहयो विभागाने त्यांच्या योजनेतून वगळून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे मात्र त्याला अदयाप मंजूरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे तीन कि.मी. च्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.३९.०० लक्ष इतका निधी आवश्यक असून पक्का रस्ता नसल्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना या रस्त्यावरुन ये-जा करणे अडचणीचे ठरत असल्याचे तसेच रस्त्यावरुन वाहने जाण्याची सोय नसल्याने रुग्णांना लाकडी बांबूला डोली बांधून न्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत खरे आहे.
(४) व (५) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली असून प्रश्नांकित प्र.जि.मा. ४७ ते नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या ग्रामीण मार्ग क्र. १३८ रस्त्याची प्रत्यक्षात २.५०० कि.मी. लांबी आहे. यापैकी ०/०० ते ०/४०० व १/०० ते १/५०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभाग, ०/४०० ते १/०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभाग व १/५०० ते २/५०० कि.मी. लांबी माती(मुरमी) पृष्ठभागाची आहे.

जिल्हा वार्षिक योजना २०१७-१८ ग्राम पंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत सदर रस्त्याच्या सा.क्र.१/०२० ते १/५०० मध्ये खडीकरण व डांबरीकरण करण्यासाठी रु. ७.०० लक्ष मंजूर करण्यात आले आहेत. तसेच या रस्त्याच्या सा.क्र.२/०० मध्ये मोरी दुरुस्ती करणे, वाहून गेलेला रस्ता दुरुस्त करणे तसेच संरक्षक भिंत बांधणे या कामासाठी रु.१०.०० लक्ष सन २०१७-१८ अतिवृष्टी अंतर्गत मंजूर आहेत. वरील दोनही कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

या रस्त्याच्या ०/०० ते १/०० व १/५०० ते २/५०० कि.मी. मधील रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०१८-१९ अंतर्गत ०/०० ते १/०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

उर्वरीत लांबीच्या रस्त्याचे काम निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.

---

## अमरावती शहरातील महत्वाच्या ठिकाणी सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(५०) १३४७४९ (३०-०१-२०१९). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अंत्यत महत्वाच्या असलेल्या १४ मुख्य चौकातील सिसीटिव्ही कॅमेरे बसविण्याकरिता जिल्हा नियोजन समिती द्वारे सन २०१८-१९ या वर्षामध्ये रुपये ९९ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे, परंतु या प्रस्तावाच्या तांत्रिक मंजुरीचा प्रस्ताव गृह मंत्रालयाकडे माहे ऑगस्ट, पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदरहू प्रस्तावास मंजुरी का देण्यात आली नाही,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावावर निर्णय घेऊन प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) (२) व (३) अमरावती शहरात जिल्हा नियोजन समितीमार्फत उपलब्ध करण्यात येणाऱ्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव दि.१४.०१.२०१९ रोजी प्राप्त झाला असुन सदरचा प्रस्ताव माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे तांत्रिक मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.